दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## 'मविआ'चा जागावाटपाचा फार्म्युला ठरला?; ठाकरे २३, काँग्रेस १६, पवार गट ९ जागांवर लढणार

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे. सुरूवातीपासून आग्रही असलेले शिवसेना ठाकरे गट लोकसभेच्या ४८ पैकी २३ जागांवर लढणार आहे. त्यापैकी २ जागा ठाकरे गट मित्रपक्षांना देणार आहे. तर काँग्रेसच्या वाट्याला १५ ते १७ जागा मिळणार असून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला ९ ते ११ जागा मिळणार असल्याची माहिती विश्वसनिय सूत्रांकडून देण्यात आली.

ठाकरे गट मुंबईत ४ जागा लढण्याच्या तयारीत आहे. शरद पवार गट उत्तर मुंबईसाठी उत्सुक नाही. त्यामुळे उत्तर मुंबईची जागा कुणी लढणार नसेल तर ठाकरे गट लढणार असेही सांगितले जात आहे. ठाकरे गटाचा सुरुवातीपासूनच लोकसभेच्या ४८ पैकी २३ जागांवर दावा आहे. विशेष म्हणजे यापैकी २१ जागांवर शिवसेना ठाकरे गट निवडणूक लढणार आहे. तर २ जागा मित्रपक्षांना देण्याची तयारी ठाकरे गटाची आहे. यातली हातकणंगले ही एक जागा ठाकरे गट राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी सोडायला तयार आहे. तर अकोल्याची एक जागा ठाकरे गट मित्रपक्ष असलेल्या वंचित बहुजन आघाडीला देखील सोडायला तयार आहे. वंचित सोबत आल्यास त्यांना आणखी एक ते दोन जागा दिली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

(वर्ष ६३ वे अंक ६७) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.०१ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)

# आत टाकून तर दाखवा, लाट काय असते ते कळेल

## मनोज जरांगेंचा उपमुख्यमंत्री फडणवीसांना इशारा

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- मला अटक करू द्या, ज्या जेलमध्ये असेन, ज्या रस्त्याने जाईल तेव्हा कोट्यवधी लोक रस्त्यावर दिसतील. लाट काय असते ते कळेल असा रोखठोक इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. तसेच कुठलीही यंत्रणा वापरा, काहीही झालं तरी मी हटत नाही असेही ते म्हणाले.

आज प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. मी दोषी नाही. मी समाजासाठी लढतोय. उभं आयुष्य पणाला लावले आहे. आम्हाला कायदे कळत नाहीत का...संचारबंदी कधी लावावी लागते हे आम्हालाही माहित आहे. रात्रीच्या वेळी सरकारच्या कारवाया सुरू आहेत असे जरांगे म्हणाले. मी शेतकऱ्याचं पोरगं, ग्रामीण भागात राहिलो आहे. माझी भाषा तशीच आहे. फडणवीस आणि माझं शत्रुत्व नाही. मी कुणाला घाबरत नाही. मला तुरुंगात टाकले तरी माघारी परतल्यावर पुन्हा आरक्षणासाठी लढेन. सगेसोयरेची अंमलबजावणी करा हेच मराठे तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचतील असे विधान मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.

तसेच मराठा समाजाच्याविरोधात कुणी बोललं तर मी सहन करत नाही. कुणबी आणि मराठा एकच आहे. मी सर्वांवर टीका केली. मराठा आरक्षणाविरोधात जो कुणी जाईल त्याला सोडणार नाही. मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नका. आरक्षणाव्यतिरिक्त आमची दुसरी कोणतीही मागणी नाही. समाज हा राज्याचा मालक आहे. सरकार मालक नाही, असेही जरांगे म्हणाले.

दरम्यान, मी गद्दार नाही. पाठीत खंजीर खुपसत नाही. देवेंद्र फडणवीस माझे शत्रू नाहीत. ते त्या पदावर नसते तर आम्ही त्यांना कशाला बोललो असतो? तसेच संपूर्ण राज्यात ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाची फसवणूक केली त्या सर्वांच्या विरोधात गुन्हा दाखल करणार. सामुहिक कट रचून आमची फसवणूक केली असे गुन्हे आम्ही सरकारवर दाखल करू, असा इशाराही जरांगेंनी दिला आहे.

तसेच माझ्यात जीवात जीव आहे तोपर्यंत आरक्षणासाठी लढत राहणार आहे. फडणवीस त्यांचा



डाव १०० टक्के यशस्वी करतील. त्यात ते माहीर आहेत. माझ्याविरोधात अहवाल तयार होत आला आहे. मला गुंतवायचे प्रयत्न सुरू आहेत. मराठा आमदार, खासदार फडफड करायला लागलेत, असं म्हणत जरांगेंनी विरोधात बोलणाऱ्या नेत्यांवर टीका केली आहे.

मराठा समाजाला दिलेल्या १० टक्के आरक्षणाला मान्य करण्यास मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तयारी दर्शवली आहे. मात्र, त्यासोबतच एक नवीन अट देखील राज्य सरकार समोर ठेवली आहे. मी दहा टक्के आरक्षण मान्य करायला तयार आहे, मात्र हे दहा टक्के आरक्षण ५०% च्या मर्यादित देण्यात यावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

# बारामतीत महारोजगार मेळाव्यासाठी येणाऱ्या मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना जेवणाचे निमंत्रण

## शरद पवार यांची नवी खेळी

बारामती दि.२९ (प्रतिनिधी)- बारामती मध्ये असलेल्या विद्या प्रतिष्ठान येथील बारा एकरच्या मैदानावर महारोजगार मेळाव्याचे आयोजन राज्य शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी स्थानिक खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे आणि वंदना चव्हाण यांना देखील निमंत्रण देण्यात आले आहे. मात्र, या निमंत्रीतांच्या यादीमधून राज्यसभेतील खासदार शरद पवार यांना वगळण्यात आले आहे. मात्र, शरद पवार यांनी वेगळीच खेळी करत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना अडचणीत आणले आहे. शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बारामतीमध्ये असलेल्या आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले आहे.

यासंबंधी शरद पवार यांच्या वतीने मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांना अधिकृत पत्र पाठवण्यात आले आहे. बारामती मध्ये कोणताही कार्यक्रम असल्यास शरद पवार हे आलेल्या पाहुण्यांना आपल्या घरी आवर्जून जेवणासाठी बोलवतात. त्याचप्रमाणे यावेळी त्यांनी मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांना जेवणाचे निमंत्रण दिले आहे. मात्र, आता हे नेते शरद पवार यांचे निमंत्रण स्वीकारतील का? हे पाहावे लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांचा बारामती जिल्हा दौरा आहे. त्यातच बारामती मध्ये येणाऱ्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना शरद पवार यांनी फोन करून देखील आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले आहे. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाही समावेश आहे. त्यामुळे आता अजित पवार हे शरद पवार यांच्या बारामती मधील निवासस्थानी जेवणाचे निमंत्रण स्विकारणा का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# मराठा आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल

## आरक्षण टिकण्याचा विश्वास; विनोद पाटील यांचा दावा

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या वतीने मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाच्या बाबत मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. या आधी देखील दोन वेळा मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. मात्र, या विरोधात याचिका दाखल करुन आरक्षण रद्द करण्यात आले होते. त्यामुळे एक बाजू ऐकून आरक्षणाची अडचण वाढू नये, यासाठी ही कॅव्हेट दाखल करण्यात आली असल्याचे मराठा आरक्षणाचे याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी म्हटले आहे. या संदर्भात त्यांनी माध्यमांना माहिती दिली.

मराठा आरक्षणाबाबत मराठा समाजात संभ्रम निर्माण झाला आहे. तर या बाबत कोणताही संभ्रम ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे. या वेळी दिलेले मराठा आरक्षण टिकेल, असा मला विश्वास वाटत असल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे. ज्या मराठा बांधवांच्या कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत. त्यांनी ओबीसी प्रवर्गातून आरक्षण घ्यावे, तसेच ज्यांच्या नोंदी सापडलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी हे दहा टक्के आरक्षण देण्यात आले असल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे. तसेच इतरांसाठी देखील आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातून आरक्षण देण्यात आले असल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणासाठी माझी न्यायालयीन लढाई सुरू आहे. सुप्रीम कोर्टात क्रिएटिव्ह याचिका पेंडिंग आहे. यापुढे देखील माझे न्यायालयीन लढाई सुरू राहील आणि त्यासाठी हे कॅव्हेट दाखल केला असल्याचे विनोद पाटील यांनी सांगितले.

# १९९३ च्या साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी अब्दुल करीम टुंडा निर्दोष

## अजमेरच्या टाडा न्यायालयाचा निकाल

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- १९९३ च्या साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी अब्दुल करीम टुंडा याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. राजस्थानमधील अजमेरच्या टाडा कोर्टाने हा निर्णय दिला आहे. बॉम्बस्फोटानंतर तब्बल ३१ वर्षांनंतर न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागेले होते. आता न्यायालयाने अब्दुल करीम टुंडाची निर्दोष मुक्तता केली आहे. यासह टाडा न्यायालयाने इरफान आणि हमीदुद्दीन यांना दोषी घोषित केले आहे.

१९९३ मध्ये मुंबई, कानपूर, हैदराबाद, सुरत आणि लखनऊच्या काही ट्रेनमध्ये एकापाठोपाठ एक स्फोट झाले होते. या प्रकरणी अब्दुल करिब टुंडा, इरफान आणि हमीमुद्दीन यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. अब्दुल करीम टुंडा याला २०१३ मध्ये नेपाळ सीमेवरून पकडण्यात आले होते. सर्व आरोपींविरुद्ध टाडा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात आतापर्यंत दीडशेहून अधिक जणांची साक्ष झाली आहे.

सीबीआयने टुंडाला या बॉम्बस्फोटांचा मास्टरमाइंड मानले होते आणि त्याला २०१३ मध्ये नेपाळ सीमेवरून अटक करण्यात आली होती. टुंडावर देशात विविध ठिकाणी दहशतवादाचे खटले प्रलंबित आहेत. टुंडाने तरुणांना भारतात दहशतवादी कारवाया करण्यासाठी प्रशिक्षण दिल्याचा आरोप आहे. जुनैद या पाकिस्तानी नागरिकासह त्याने १९९८ मध्ये गणेशोत्सवादरम्यान दहशतवादी हल्ला करण्याची योजना आखल्याचेही बोलले जाते.

दरम्यान मुंबई बॉम्बस्फोटात सहभागी होण्यापूर्वी टुंडाने जलीस अन्सारी सोबत मुंबईतील मुस्लिम समाजासाठी काम करण्याच्या उद्देशाने तन्झीम इस्लाह-उल-मुस्लिमीन या संघटनेची स्थापना केली होती.

## आजपासून दहावीची परीक्षा

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) १ ते २६ मार्च या कालावधीत होणार आहे. परीक्षेसाठी १६ लाख ९ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठीच्या उपाययोजना राज्य मंडळाने केल्या असून, २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. निवडणूक आचारसंहिता लागली, तरी परीक्षेवर फारसा परिणाम होणार नाही. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

# सेमीकंडक्टर चिपच्या १.२६ लाख कोटींच्या ३ प्रकल्पांना मोदी सरकारची मंजुरी

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- गुजरात आणि आसाममध्ये १.२६ लाख कोटी रुपयांच्या अंदाजे गुंतवणुकीसह तीन सेमीकंडक्टर प्लांट उभारण्याच्या प्रस्तावांना मोदी सरकारने गुरुवारी मंजुरी दिली. येत्या १०० दिवसांत तिन्ही प्रकल्पांचे बांधकाम सुरू होणार आहे. याअंतर्गत टाटा समूह २ प्लांट उभारणार आहे, तर एक प्लांट जपान आणि थायलंडच्या कंपन्या संयुक्तपणे उभारणार आहेत. तीन प्लांटच्या उभारणीमुळे देश सेमीकंडक्टर उत्पादनाच्या क्षेत्रात महत्त्वाच्या दिशेने वाटचाल करणार आहे. भारताला सेमीकंडक्टरचे मोठे उत्पादन केंद्र बनायचे आहे. देशातील विविध सरकारांनी प्रयत्न केले पण ते प्रभावी होऊ शकले नाहीत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली हे शक्य झाले आहे, असंही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणालेत.

इलेक्ट्रॉनिक्स आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर म्हणाले की, भारताने गेल्या दोन वर्षांत सेमीकंडक्टर क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. या कालावधीत सरकारला जागतिक चिप उत्पादकांकडून २.५० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

# फडणवीस यांच्या विरोधात अवमानास्पद पोस्ट करणाऱ्या योगेश सावंतला अटक

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात अवमानास्पद पोस्ट शेअर केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी योगेश सावंत नामक तरुणाला अटक केली आहे. तो राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या सोशल मीडिया सेलचा कार्यकर्ता आहे. त्यांच्या अटकेवरून गुरुवारी विधानसभेत सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या आमदारांत तीव्र शाब्दिक चकमक उडाली.

योगेश सावंतवर देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात अवमानास्पद भाषा वापरून त्यांना जीवे मारण्याच्या धमकीची पोस्ट शेअर केल्याचा आरोप आहे. मुंबई पोलिसांनी बुधवारी रात्री त्याला अटक केली. त्याच्यावर भादंवि कलम १५३(अ), ५००, ५०५(३), ५०६(२) व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मराठा आंदोलकांची प्रतिक्रिया घेणारा एक व्हिडिओ तथाकथित गावरान विश्लेषक नामक एका यूट्यूब चॅनलवर प्रकाशित झाला. यामध्ये एका अज्ञात व्यक्तीने ब्राह्मण समाजाला संपवण्याचे वक्तव्य केले. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी एकेरी वक्तव्य करत त्यांच्यावर टीका केली. योगेश सावंतने हा व्हिडिओ आपल्या ट्विटर हँडलवर शेअर केला. पण पोलिसांनी हा व्हिडिओ टाकणाऱ्या चॅनेलवर कारवाई करण्यापूर्वीच योगेश सावंतला अटक केली. आता त्याच्या अटकेचे विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तीव्र पडसाद उमटत आहेत.

## गुणरत्न सदावर्ते यांच्या सनद निलंबन निर्णयाला स्थगिती!

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- डॉ. गुणरत्न सदावर्ते यांना बार काऊंसिल ऑफ इंडियाने मोठा दिलासा दिला आहे. गुणरत्न सदावर्ते यांची सनद दोन वर्षांकरत निलंबित करण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र आणि गोवा बार काऊन्सिलने शिस्तभंगाची कारवाई करत सदावर्तेंवर कारवाई केली होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी हिंसक आंदोलन केलं होतं. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी सदावर्तेविरोधात गुन्हा दाखल केला होता.

या आंदोलनादरम्यान माध्यमांसमोर वारंवार केलेली बेजबाबदार विधानं, तसेच त्यावेळी वकिलांसाठीचा पांढरा बँड परिधान करून वकिलांसाठीच्या आचारसंहितेचं उल्लंघन केल्याचा आरोप सदावर्तेंवर आहे. याप्रकरणी पिंपरी न्यायालय वकील संघटनेच्या अध्यक्षांनी सामाजिक कार्यकर्ते नितीन यादव यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन सदावर्ते यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली होती.

# आमच्यावर आता भ्रष्टाचाराऐवजी घराणेशाहीचे आरोप-सुप्रिया सुळे

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून आपले बंधू तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टोला हाणला आहे. आमच्यावर पूर्वी भ्रष्टाचाराचे आरोप व्हायचे. पण आता आमच्यावर केवळ घराणेशाहीचे आरोप होतात. याचा अर्थ आता आम्ही भ्रष्टाचार मुक्त झालो आहोत, असे त्या



म्हणाल्या आहेत. भाजपने अशोक चव्हाण यांच्यावर संसदेत विधवा महिलांचे पैसे खाल्ल्याचा आरोप मी माझ्या कानाने ऐकला व डोळ्यांनी पाहिला, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून भाजप व अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीवर निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या ७० हजार कोटींच्या कथित भ्रष्टाचारावर टीका केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अजित पवार भाजपसोबत (पान ४ वर)

## राज्यात कायदा व सुव्यवस्था कोलमडलेली, एकनाथ खडसेंचा हल्लाबोल

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राची ओळख ही संतांची आणि महापुरुषांची ओळख म्हणून आजपर्यंत होती. परंतू, अलीकडच्या काळामध्ये कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती जर पाहिली तर, वाढती गुन्हेगारी ही महाराष्ट्राची ओळख आहे. राज्यभरामध्ये हजारो कोटींचे ड्रग्स येतातच कसे? ५ हजार कोटींचे ड्रग्स पुण्यामध्ये पकडले गेले. परंतू, ते तिथे आलेच कसे? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात खडसे यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारवर हल्ला चढवला. राज्यात कायदा व सुव्यवस्था कोलमडलेली असल्याचा आरोप करत दरोडा, चोरी, मारामारी, जुगार या सर्वांचे अड्डे वाढले असल्याचे ते म्हणाले.

आमदारच गोळीबार करून दमदाटी (पान ४ वर)

# केरळच्या राज्यपालांनी असंवैधानिक घोषित केलेल्या लोकायुक्त विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी (२८ फेब्रुवारी) केरळ लोकायुक्त कायदा दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली आहे. राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी हे विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठवले होते. राज्यपालांसोबत सुरू असलेल्या वादात राज्य सरकारचा हा मोठा विजय म्हणून पाहिले जात आहे. विधानसभेने ऑगस्ट २०२२ मध्ये लोकायुक्त दुरुस्ती विधेयक मंजूर केले होते. या दुरुस्तीमुळे लोकायुक्तांचे अधिकार कमी झाल्याचा आरोप आहे.

लोकायुक्त विधेयकातील दुरुस्ती घटनाबाह्य असल्याचे सांगत राज्यपालांनी विधेयकावर स्वाक्षरी करण्यास विलंब केला होता. राज्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर, खान यांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये राष्ट्रपतींना सात विधेयके पाठवली होती. सुप्रीम कोर्टाने केरळ सरकारच्या याचिकेवर सुनावणी केली होती, ज्यामध्ये राज्यपालांकडून विधेयक मंजूर करण्यात अनावश्यक विलंब झाल्याचा उल्लेख करण्यात आला होता. विनाकारण विलंब होत असल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली होती. यानंतर राज्यपालांनी ही विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली.

## सत्संग : आनंदी जीवनाचे रहस्य

भूतलावरील प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुख, दुःख, यश, अपयश, आशा, निराशा यांनी युक्त आहे. या भूतलावरील कुणीही मानव प्राणी पूर्णतः सुखी नाही आणि पूर्णतः दुःखीही नाही. या भूतलावरील प्रत्येक व्यक्ती अनादीकाळापासून सुखाचा शोध घेत आलेला आहे. आजही प्रत्येक जन सुख, शांती शोधत आहेत. आनंदाचा शोध घेत आहे. मात्र या बाबी व्यक्तीला सापडलेल्या नाहीत. सुख तर व्यक्तीजवळच आहे. शांतीही व्यक्तीजवळच आहे. परंतु उगाच व्यक्ती इकडे-तिकडे भटकून या बाबी शोधत असतात. सुख शांती व समाधानाला शोधण्याची गरज नाही तर ते प्राप्त करून घेण्याची गरज आहे. हिंदीमध्ये एक सुभाषित आहे. 'सुंदर वस्तु हमेशा प्रसन्नता प्रदान करती है'' (A thing of beauty is joy for ever) या सुंदर वस्तूंनांच सत्संग म्हणतात. सत्संग म्हणजे सज्जनांची संगत सज्जनांचा सहवास. ज्या कुणाला सज्जनाची संगत व सहवास लाभतो ती व्यक्ती या भुतलावरील खरी सुखी व समाधानी व्यक्ती आहे. सुखाची प्राप्ती सज्जनांच्या भेटीत असते. सुखाची प्राप्ती प्रसन्न ठिकाणी असते. मात्र ते प्राप्त करणे अजिबात अवघड नाही. सत्संगाची अनुभुती व कृती ही हृदयापासून हवी. वर वर सत्संग केल्याने सुख प्राप्त होत नाही. तो सत्संग मनापासून हवा तरच सुख व शांती मिळते.

या भूतलावरील मानवाला जर आपल्या जीवनातील मरगळ दूर करावयाची असेल चिंतामुक्त, निराशावादी, हताश, हतबल झालेले जीवन त्यामागून सुखी व समाधानी जीवन जगावयाचे असेल तर त्यांनी सज्जनांशी सत्संग केलाच पाहिजे. आज समाजात सत्संगाबाबत बरीच जागृती झालेली आहे. सत्संग सोहळा सत्संग व विचार मंथन असे बरेच कार्यक्रम दररोज कुठे ना कुठे घडतात व हजारोंच्या संख्येने नागरिक मोठ्या आशेने या सत्संग सोहळ्याला जातात मात्र 'मनी नाही भाव देव मला पाव' हा भाव असल्यास सत्संगातून काहीच प्राप्त होत नाही. आज सत्संग सोहळा झाला की, उद्या पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' ही स्थिती मानवाची होत आहे. सत्संग हा मनापासून हवा. सत्संग हा ध्यान धारणा युक्त असावा. सत्संग हा निश्चयाने परिपूर्ण असावा. सत्संग हा तन, मन व विचाराने असावा. सत्संग हा आयुष्यभराचा असावा. सत्संगातून प्राप्त झालेले सत्विचार सत्दृष्टी, सद्वर्तन आयुष्याचे अंग अंग बनावे तसेच आचरणाचेअविभाज्य घटक बनावे तरच सत्संगाचा लाभ होतो. अशा व्यक्तीचे सुख शांती व समाधानाचे झरे त्या व्यक्तीच्या जीवनात सातत्याने वाहतात त्या व्यक्तीच्या व्दारे विधायक व रचनात्मक कामे पार पडतात. ज्यातून ज्ञानाची, आनंदाची गंगा सातत्याने वाहते. सत्संगातून खालील गोष्टीही प्राप्त होतात. सत्संग म्हणजे सज्जनाशी संगत व्यक्तीचे जीवन जीवनातील विविध प्रकारच्या घटना बनते. व्यक्तीची बुद्धीही मरगळल्यासारखी बनते जीवन निराशामय बनते. अशा समयी या अस्थिर व अस्वस्थ चित्ताला स्थिरत्व देण्याचे काम सत्संग करते. सत्संगाने सद्विचार, सद्भावना निर्माण होते. मत परिवर्तन होते. सत्संगामुळे सज्जनाच्या विचारांची छाप मनावर पडते. मनातील कुविचार निघून जातात. चित्ताला प्रसन्नता येते. मन आनंदीत व प्रफुल्लीत बनते. सज्जनांचा सहवास हवा हवा वाटतो व सर्वच चांगल्या गोष्टी करावयाशा वाटतात. त्यामुळे जीवनातील मरगळ, बुद्धीची मरगळ सत्संगाने दूर होते व चांगल्या विचारांनी मन उल्हासित होते.

सत्संग म्हणजे सज्जनांची भेट. ही केवळ भेट म्हणूनच मर्यादित राहत नाही तर चांगले विचार, चांगले प्रवचन यामुळे चांगले प्रबोधन होते व मनाला नव आशा पल्लवीत करतात. सज्जनांच्या सहवासाने दुर्जन ही सज्जन बनतात. सज्जनाचा सहवास जीवनाला विधायक दिशा दर्शवितो. मनातील विकार घालवितो. व्यसनांनाही आळा घालतो. सत्संगाने मन स्वच्छ बनते. निर्मलता, प्रामाणिकता व कर्तव्यता या बाबी सत्संगानेच धारणा केल्या जातात. चांगल्या माणसांना भेटण्याची इच्छाच मनाला टवटवीत बनविते. कितीही वाईट व्यक्ती असला तरी चांगल्याची संगत त्याला लाभली तर तो आपले वाईट गुण मागे टाकतो व सद्गुणांचा स्वीकार करतो यासाठी सत्संग हा सर्वांसाठी आवश्यकच आहे.

सत्संग हा साधू, संत प्रवचनकार, किर्तनकार यांच्याशीच होतो असे नाही तर जगात जे जे चांगले आहे जे-जे उत्तम आहे. जे-जे सर्वोत्कृष्ठ आहे त्यांच्या सहवासात राहणे, वारंवार त्याची संगत करणे, सत्संगातील सर्व चांगल्या गोष्टी आयुष्यात उतरविणे व त्याप्रमाणे आपले आचरण ठेवणे म्हणजे सत्संग होय. साधू, संताशी जर सत्संग होत असेल तर ते अती उत्तम परंतु साधू-संत वारंवार आपणाला भेटतीलच असे नाही. यासाठी समाजात जे-जे चांगले आहे. त्यांच्याशी सातत्याने संपर्कात राहणे यालाही सत्संग म्हणतात. जे जे विधायक आहे. ते करणे म्हणजेही सत्संगच होय समाजकार्य जनकल्याण करणे, उपेक्षितांना सहाय्य करणे, मदत करणे यालाही सत्संगच म्हणतात. सत्संग म्हणजे समाजात जे जे चांगले आहे त्याच्यासोबत राहणे होय. सत्संगातून प्रत्येक व्यक्तीच्या अंगी अनेक चांगले गुण बनवतात. सत्संग हा चांगल्याशीच होत असल्याने प्रामाणिकपणा, कर्तव्यपरायणता, नम्रता, सत्यता, माधूर्य, आदरभाव, कृतघ्नता देश व समाजाप्रती समर्पण भावना, मर्यादा, निष्ठा आपुलकी, स्नेह जिव्हाळा, सामाजिक बांधिलकी अशा कितीतरी चांगल्या गोष्टी सत्संगातून अंगी बनवतात व व्यक्ती प्रामाणिकपणाचे परोपकारी जीवन जगते. अशा प्रकारच्या जीवनातूनच खरे सुख, समृद्धी शांती व समाधान प्राप्त होते अशी व्यक्ती मनाने सदा प्रसन्न व आनंदी राहते. या व्यक्तीच्या जीवनात कशाचीही उणीव राहत नाही सर्व बाबी या व्यक्तीला भरभरून प्राप्त होतात. सत्संगातून चांगले विचार व गुणधारण केल्याने त्या व्यक्तीच्या जीवनात भरभराट असते. दुःख आले तरी ते क्षणिक असते. आत्म्याच्या शांतीसाठी, सुख व समाधान तसेच उन्नती व प्रगतीसाठी सत्संगासारखे दुसरे उत्तम माध्यम जगात नाही. सत्संगाने व्यक्तीतील दुर्गूण लोप पावतात व त्यांची जागा सद्गुण घेतात. यामुळे कुटुंबातील सर्वच सदस्य प्रभावीत होतात. कुटुंबातील सर्वच सदस्य लहान मोठे चांगल्या गुणांना धारण करतात. त्यांच्या वर्तनात चांगुलपणा, सहकार्य, सद्भाव, सद्वर्तन दिसून येते असे कुटुंब समाजात आदर्श जीवन जगते व जीवनातील खरा आनंद उपभोगते. 'मन चंगा तो कठोती मे गंगा' असे जे म्हटल्या गेलेले आहे. ते योग्य आहे. आपले मन निरोगी ठेवावयाचे असेल. शारीरिक व मानसिक आजारांना घालवून आनंदी जीवन जगायचे असेल तर सत्संगशिवाय पर्याय नाही. विविध शारीरिक व मानसिक व्याधींना समूळ घालविण्याकरिता सत्संग हे प्रभावी औषध आहे. या विश्वातील प्रत्येकाने सत्संग करावा व आपल्याबरोबर आपल्या कुटुंबांचे व समाजाचे जीवन मंगलमय करावे यातच खरा आनंद सामावलेला आहे. सत्संगाचे जीवन सुख, शांती व समाधानाचे असते. चला आपण सत्संग करू या व आनंदी जीवन जगू या.

# जीवन जगण्याची कला शिकवणारा ग्रंथ..

**समीक्षा :** श्रीमती मनीषा जाधव अंतरकर.

**'भगवान बुद्ध-आनंदी जीवनाचा मार्गदाता'**

**लेखक-** डॉ. के. पी. वासनिक, नवी दिल्ली अनुवाद भीमराव सरवदे, औरंगाबाद.

**प्रकाशक :** आनंद प्रकाशन,औरंगाबाद. किंमत: ३०० रूपये. पृष्ठे ३०४.

**भगवान** बुद्ध -आनंदी जीवनाचा मार्गदाता हे डॉ.के.पी.वासनिक यांचे पुस्तक वाचून अतिशय आनंद झाला.पुस्तक वाचून मन शांत झाले.आज आपण अनेकजण निराशाजनक दुखी अवस्थेत जीवन जगत असतो.या निराशाजनक जीवनातून, दुःखातून बाहेर काढण्यासाठी के.पी.वासनिक यांचे भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्गदाता हे पुस्तक अतिशय योग्य आहे.म्हणतात ना जगाला युद्ध नको बुद्ध हवा. अशाच बऱ्याचशा गोष्टी या पुस्तकातून लेखकांनी मांडलेले आहेत.

अतिशय साध्या सरळ भाषेमध्ये पुस्तक असल्यामुळे वाचनाचा अजिबात कंटाळा येत नाही.मी माझा अनुभव सांगते मी हे पुस्तक दोन वेळा वाचले.प्रत्येक वेळा मला याच्यातून वेगळं ज्ञान प्राप्त झालं.हे पुस्तक केवळ वाचून बाजूला ठेवण्याचा विषय नाही.असे माझ्या लक्षात आले.मी शाळेमध्येही पुस्तक माझ्यासोबत ठेवते. जेव्हा मनामध्ये निराशा दुःख निर्माण होतं. तेव्हा तेव्हा या पुस्तकातून मला प्रेरणा मिळते आनंद मिळतो. हे पुस्तक म्हणजे जगण्याची कला शिकवणारा ग्रंथ आहे. लहानापासून तो मोठ्यांपर्यंत प्रत्येकजण वाचनाचा आस्वाद घेतल्यास प्रत्येकाच्या जीवनामध्ये बदल नक्कीच होईल.असेच विचार लेखकांनी अनेक उदाहरणं देऊन आपल्याला पटवून दिलेले आहेत. पुस्तकामध्ये एकूण १३ प्रकरण आहेत. भगवान गौतम बुद्ध,भगवान बुद्धांचा पहिला धम्मोपदेश, चार आर्यसत्य, पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, मध्यम मार्ग, कारण आणि परिणाम, अनित्य, शून्यता, विपश्यना, प्रतित्यसमुपाद, निब्बान प्रत्येक प्रकरण म्हणजे जीवनात खूप मोठी शिकवण आपल्याला देऊन जाते. लेखकांचा हा ग्रंथ वाचून मला खऱ्या अर्थाने गौतम बुद्ध समजले. भगवान बुद्धांचा जन्म,बालपण, ग्रहत्याग याच्या विषयी सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. भगवान बुद्ध सत्याच्या शोधात निघाले त्यांनी ज्ञान प्राप्त केले. मानवाला दुःखातून मुक्त करण्यासाठी भगवान बुद्धांनी सर्व कार्य केलेले आहे. लेखक मांडणी करतात की भगवान बुद्धाला शिक्षक म्हणून आपल्या जबाबदारीची जाणीव झाली आणि शिक्षक या भूमिकेतून त्यांनी अनेक ठिकाणी प्रवचाने केली.ज्ञानप्राप्तीनंतर कपिल वस्तूंची पहिली भेट या प्रकरणातून मला खरंच खूप चांगल्या गोष्टी समजल्या.भगवान बुद्धांनी जरी ग्रहत्याग केला होता .तरी त्यांचे वडील आजारी असताना त्यांनी आपल्या वडिलांची काळजी घेतली. तथागत भगवान बुद्धांचे आपल्या पित्याला संबोधन अतिशय मनाला स्पर्श करून जाते. भगवान बुद्धांची आई पत्नी आणि मुलाबरोबर ची शेवटची भेट.भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण या गोष्टीतून असे लक्षात येते की माणसाने कोणत्याच गोष्टींचा मोह करता कामा नये.महापरिनिर्वानाच्या आधी भगवान बुद्ध प्रवचन करतात त्यात ते सांगतात,मी तुम्हाला सल्ला देतो की नाश पावणे स्वाभाविक आहे.मेहनतीने स्वतःच्या मुक्तीसाठी प्रयत्न करा .कोणत्याही धार्मिक गुरूंचे नेत्याचे अनुसरण करू नका. त्यांच्या शिकवणुकीचे अनुसरण करा.मृत्यूकडे पाहायला लावणारा एवढा सकारात्मक दृष्टिकोन भगवान बुद्ध आपल्याला देतात.

बुद्धांची शिकवण प्रत्येक माणसाला स्वतःकडे खेचून घेऊ शकते. जातीव्यवस्थेची अन्यायकारक व्यवस्था बुद्धांना मान्य नव्हती. लेखक म्हणतात की ज्ञानसाधना आणि ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने इतर कोणत्याही धार्मिक गुरुशी त्यांची तुलना होऊ शकत नाही याचा अनुभव हे पुस्तक वाचल्यावर मला आला. बुद्धांचे तत्त्वज्ञान अगदी साधे सरळ आहे ते अंधश्रद्धेला नकार देतात. भगवान बुद्ध स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडतात. भगवान बुद्धांनी देवाच्या अस्तित्वावर कोणतीही टीका टिप्पणी केली नाही कारण ह्या गोष्टी माणसाला सुखी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी आवश्यक नाहीत. भगवान बुद्ध लोकांना दुःख आणि दुःखापासून मुक्ती मिळवण्यासाठी परिश्रम घेण्याचा सल्ला देतात. जीवनात खरे ज्ञान मिळवणे आणि त्या ज्ञानाचा उपयोग करून घेणे इतरांसाठी व स्वतःसाठी लेखकाने सुटसुटीत पद्धतीने भगवान बुद्धांच्या विचाराची मांडणी केलेली आहे. भगवान बुद्धांनी स्वतःला कधीच तारणहार म्हणून घोषित केले नाही. भगवान बुद्ध इतरांच्या श्रद्धा आणि धर्माचा आदर करण्यास सांगतात. भगवान बुद्धांचे जीवन म्हणजे प्रेम मैत्री आणि करुणा. भगवान बुद्धांचा शेवटचा संदेश मध्ये ते सांगतात. माझी शिकवण ही काही शिकवण किंवा तत्त्वज्ञान नाही ती माझ्या प्रत्यक्ष अनुभवाचा परिणाम आहे. मानव कल्याण हे त्यांच्या धम्माचं मुख्य उद्दिष्ट आहे.

भगवान बुद्धांचा पहिला धम्मोपदेश या प्रकरणातून प्रत्येक व्यक्तीने तीन मार्गाचे अनुसरण करावे.पावित्र्याचा मार्ग सदा चरणाचा मार्ग आणि शील माग.र्चार आर्य सत्य अष्टांगिक मार्ग दहा पारमिता आचरण कसे करावे.भगवान बुद्ध म्हणजे समाजाला योग्य दिशा देणारे एक समाज सुधारक अशी मांडणी लेखक करतात.

प्रकरण तिसरे चार आर्य सत्य. माणूस जन्माला येतो तेव्हापासून त्याच्या दुःखाला सुरुवात होते. दुःख,दुःख समुदाय, दुःख निरोध, दुःख निरोध मार्ग या चार आर्य सत्याची ओळख लेखक आपल्याला करून देतात. दुःख तीन प्रकारचे असते. शारीरिक मानसिक, आध्यात्मिक याची मांडणी लेखक करतात. भगवान बुद्ध दुःखाची आठ कारणे सांगतात. त्याची मांडणी या प्रकरणात आलेली आहे. भगवान बुद्धांनी सांगितलेली चार आर्यसत्य माणसाच्या जीवनातील दुःख दूर करतात. मानवी दुःखाचा शोध घेण्याचे कार्य बुद्ध या ठिकाणी करतात. दुःखाची कारणे सांगतात. जन्म, वृद्धापकाळ, आजारपण, मृत्यू, आप्तेष्टांचा विरोह, अप्रिय वस्तूंचा सामना करावा लागणे, इष्ट वस्तू न मिळणे आणि भ्रमामुळे दुःख होणे. शेवटी दुःखाच्या समाप्तीकडे नेणारा मार्ग या ठिकाणी दाखवलेला आहे. दुःखाचा नाश करणारा आष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, समयक वाणी, सम्यक कर्मात, सम्यक अजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक समाधी, समयक व्यायाम, सम्यक स्मृती या अष्टांगिक मार्गाचा जीवनात उपयोग केल्यास दुःखापासून मुक्ती होते.

प्रकरण चौथे पंचशील या प्रकरणांमध्ये लेखक पंचशील तत्त्वाची ओळख करून देतात. हिंसा न करणे, चोरी न करणे, वैभिचार न करणे, असत्य न बोलणे, मद्यपान न करणे या पंचशील तत्त्वांची ओळख होते. पाचवे प्रकरण आर्य अष्टांगिक मार्गामध्ये अष्टांगिक मार्गाची ओळख करून देतात. तसेच प्रत्येक मार्गाचे स्पष्टीकरण केलेले आहे. बौद्ध धम्माचे तीन अवश्य घटक लेखकाने मांडले आहे. नैतिक आचरण, मानसिक शिस्त आणि बुद्धी.या पाठानंतर आलेल्या सारांश मधून आपल्याला खूप काही शिकता येते. धम्मपदामध्ये नीतिमान मनुष्याचे केलेले वर्णन अतिशय मन वेधून घेते. ज्याप्रमाणे महामार्गावरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात लीली हे पुष्प मधुर सुगंधाने आणि आनंदाने भरभरून उमलते अशाप्रकारे खऱ्या अर्थाने कचऱ्यासारखे असलेल्या लोकांमध्ये अंधारात भटकणाऱ्या लोकांमध्ये प्रबुद्ध बुद्धांचा शिष्य त्याच्या ज्ञानाने चमकतो. अतिशय मनाला वेधून घेणारी सुंदर शिकवण बुद्धांनी दिलेली आहे.आणि याची मांडणी अतिशय सुंदर पद्धतीने लेखकाने केली आहे.म्हणून पुस्तक वाचत असताना खूप छान वाटते. मनाला एक आनंद मिळतो.आपण विचाराने समृद्ध होत आहोत ही भावना हे पुस्तक वाचताना होते.

प्रकरण सहावे दहा पारमिता. या प्रकरणांमध्ये लेखक दान, शील नैतिकता, प्रज्ञा, विवेक, शहाणपण, त्याग, ऊर्जा संयम, सत्य, अधिष्ठान, मैत्रीभाव, उपेक्षा किंवा समभाव, दहा पारमिता व त्याचे स्पष्टीकरण लेखकाने या प्रकरणात केलेले आहे. प्रकरण सातवे मध्यम माग. र्या प्रकरणात भगवान बुद्धांनी सांगितलेल्या जीवनाची दोन टोके आणि या दोन टोकांची ओळख लेखक आपल्याला करून देतात. टोकाची भूमिका घेण्यापेक्षा मध्यवर्ती भूमिका घेणे बुद्धांनी सांगितलेले आहे.मध्यम मार्ग पटवून देण्यासाठी लेखकाने या ठिकाणी वापरलेले उदाहरण अतिशय उद्बोधक आहे.जसे कमळाचे फुल चिखलात उगवते.चिखलातून अन्न आणि पाणी घेते.परंतु कमळाचे फुल चिखलाचा भाग बनत नाही.चिखलात राहूनही चिखलापासून वेगळे अस्तित्व टिकून ठेवते हाच मध्यम मार्ग आहे. या प्रकरणात लेखकाने मध्यम मार्गाचे व्यवहारिक उपयोगही सुचवलेले आहे. प्रत्येक प्रकरणा नंतर येणाऱ्या सारांश आपल्याला प्रकरणात आपण काय शिकलो याची जाणीव करून देतो.लेखकाने सारांशाची जी कल्पना मांडली ती अतिशय उद्बोधक आहे.

प्रकरण आठवे कारण आणि परिणाम.या प्रकरणातून लेखकाने वाईट कर्म आणि सत्कर्म हे आपल्यावर कसे परिणाम करतात.कर्माचे नियम दोन पातळ्यावर आहेत ते लेखक समजावून देतात.कारण आणि परिणाम या दोन गोष्टीही हेतू पुरस्कार आपल्यापुढे मांडतात. सत्कर्म चांगले परिणाम घडून आणतात आणि वाईट कर्म वाईट परिणाम घडून आणतात त्याची मांडणी लेखकाने केली आहे.प्रकरण नववे अनित्य या प्रकरणांमध्ये लेखकाने अस्तित्वाची तीन मूलभूत तत्त्वे मांडले आहेत. अनित्यता किंवा सततचे बदल, स्व ची भावना किंवा तथ्यहिनता आणि दुःख किंवा असमाधानकारकता वेगवेगळी उदाहरण देऊन लेखक आपल्या अस्तित्वाच्या या तीन मूलभूत तत्वाची मांडणी करतात. भगवान बुद्ध तीन प्रकारच्या दुःखाबद्दल सांगतात. दुःखाचे दुःख,परिवर्तनाचे दुःख सर्वव्यापी दुःख.. या तिन्ही गोष्टी लेखक अतिशय सुंदर पद्धतीने आपल्याला समजावून सांगतात.

प्रकरण दहावे शून्यता..या प्रकरणातून लेखकाने शून्यता ही संकल्पना समजावून सांगितलेली आहे. तिचं महत्त्व पटवून दिलेल आहे. या प्रकरणांमध्ये आचार्य नागार्जुन यांचे विचार लेखकाने मांडलेले आहे. हे विचार माणसाचे मन वेधून घेतात.

**जेव्हा शून्यता शक्य असते**
**सर्व काही शक्य असते**
**जेव्हा शून्यता अशक्य असते**
**तेव्हा काहीही शक्य नसते**

प्रकरण अकरावे विपश्यना या प्रकरणातून लेखकाने विपशनेचे महत्त्व प्रत्येकाला सांगितले. मन आणि मेंदू आनंद आणि दुःखी मन मनाच्या एकाग्रतेच्या विविध पद्धती, विपश्यना का? विपश्यना ध्यान म्हणजे काय? विपश्यना ध्यानाच्या पद्धती. विपश्यना ध्यानाचे दोन प्रकार विश्लेषणात्मक आणि केंद्रित. ध्यान करण्याच्या पायऱ्या, विपश्यनेचा कालावधी,आनापान सती प्रक्रियेतील पायऱ्या, शरीरात संवेदना कशा उद्भवतात, शरीराच्या संवेदनाचे निरीक्षण कसे करावे, संवेदनांचे निरीक्षण महत्त्वाचे का आहे, संवेदनांची तात्पर्य, ध्यान सरावासाठी पाच अडथळे आहे. त्याची मांडणी लेखक करतात. कामुक इच्छा, तिरस्कृत भावना, आळस, सुस्ती आणि तंद्री अस्वस्थता आणि काळजी, शंका अनिश्चितता संशय या सर्व बाबींची सविस्तर मांडणी लेखक करतात. विपश्यना रोज का करावी याची मांडणी अतिशय सुंदर पद्धतीने लेखकाने केलेली आहे. विपश्यनेचा सराव कोण करू शकतो. विपशनेचे फायदे कोणते आहेत. भगवान बुद्ध नंतर विपश्यनेची सद्यस्थिती काय याची मांडणी लेखकाने केलेली आहे. शेवटी भगवान बुद्धांची तीन छोटी वाक्य मोलाची शिकवण देतात. याकडे आपले लक्ष खेचले जाते.असे काहीही करू नका जे नकारात्मक असेल.सर्व काही सद्गुण चांगले सकारात्मक करा.आणि तुमच्या मनावर नियंत्रण ठेवा.

प्रकरण बारावे प्रतीत्यसमुतपाद..या प्रकरणांमध्ये लेखक परावलंबी उत्पत्तीचे उदाहरणे देतात.बारा कड्यांची साखळी व भवचक्र याची माहिती या प्रकरणात करून दिलेली आहे. चित्राद्वारे त्या बारा कड्याची माहिती सांगितलेली आहे. प्रकरण तेरावे निब्बांण या प्रकरणांमध्ये निब्बान मोक्षापेक्षा वेगळा कसा आहे. प्रत्येक जण निब्बान साध्य करू शकतो का? निब्बानचा मार्ग गौतम बुद्धांनी सांगितलाय. शेवटी भगवान बुद्धांचा शेवटचा संदेश प्रत्येकाला खेचून घेईल भगवान बुद्ध म्हणाले की आरोग्य ही सर्वात मोठी देणगी आहे. समाधान ही सर्वात मोठी संपत्ती आहे. विश्वासू मित्र हा सर्वोत्तम नातेवाईक आहे. निब्बान हा सर्वात मोठा आनंद आहे. प्रत्येक प्रकरणातून अतिशय सुंदर पद्धतीने लेखकांनी विचार मांडलेले आहेत. वेगवेगळ्या पद्धतीने उदाहरण देऊन बुद्धांनी दिलेली शिकवण प्रत्येकाला पटवून देऊन, दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग या पुस्तकात सांगितलेला आहे. प्रत्येक प्रकरणानंतर सारांश दिलेला आहे यामुळे प्रकरण वाचल्यावर आपण नेमके काय वाचले आणि काय लक्षात ठेवायला पाहिजे हे सुचविते. लेखकांनी सुखी तसेच आनंदी कसे रहावे, इतरांना सुख कसे द्यावे याचा अतिशय सुंदर पद्धतीने संदेश देवून खरंच पुस्तकाचे नाव सार्थकी लावले आहे.

'भगवान बुद्ध आनंदी जीवनाचा मार्गदाता' लेखक डॉक्टर के.पी.वासनिक यांचे अतिशय वाचनीय आणि मार्गदर्शक असे पुस्तक आहे. प्रत्येकाने वाचावे आणि आनंदी जीवनाचा मार्ग अनुसरावा असेच हे पुस्तक आहे. सर्वसामान्यांनाही हे पुस्तक वाचून खूप प्रेरणा घेता येईल. लेखकांनी पंडित्यपूर्ण लिखाण टाळलेले आहे व वाचकांना समजेल अशा भाषेतच लिखाण केलेले आहे.अगदी लहान मुलंही या पुस्तकातून प्रेरणा घेऊ शकतात. हे पुस्तक वाचून असे म्हणावेसे वाटते की खरंच आज जगाला युद्धाची नाही बुद्धाची गरज आहे.

प्रसिद्ध लेखक आयू.भीमराव सरवदे औरंगाबाद यांनी अत्यंत सोप्या मराठी भाषेत भाषांतर केले आहे तसेच श्री. शरद हतोले आनंद प्रकाशन औरंगाबाद नी या पुस्तकाची मांडणी आणि बांधणी फार सुरेख केली आहे आणि कव्हर पेज फार बोलके आणि मार्मिक आहे. प्रत्येकाने वाचावे आणि आपले जीवन आनंदी आणि सुखा समाधानाने जगावे असेच हे पुस्तक आहे.मला डॉ. के.पी. वासनिक यांचे पुस्तक वाचायला मिळाले याचा मला मनस्वी आनंद आहे आणि निश्चितच या पुस्तकांनी माझ्या जीवनामध्ये खूप बदल केलेले आहेत आणि हे पुस्तक वाचून माझ्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. खरंच मी जिथे जाते तिथे हे पुस्तक माझ्या सोबत बाळगते. मला मनापासून जे वाटले तेच मी या ठिकाणी मांडलेले आहे. प्रत्येक वाचकाने याचा अनुभव घ्यावा. वाचकानी स्वतः अनुभव घ्यावा अशी वाचकांना विनंती. अत्यंत चांगली पुस्तक लिहून लेखकाने याद्वारे आपल्याला प्रबुद्ध करण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे याबद्दल लेखक डॉ. के.पी. वासनिक, नवी दिल्ली (९८९१९०१३१६) यांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन आणि धन्यवाद.

**- मनीषा जाधव अंतरकर**

# श्रीगीता व श्रीज्ञानेश्वरी हे संकटावर मात करण्याचे स्त्रोत होत- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

जालना, दि. २९ (प्रतिनिधी) - कर्तव्य हा भक्तीचा आधारस्तंभ असल्याने भक्तीला कर्तव्याची जोड दिली तर भक्तीला बळकटी येवून आत्मबल वाढते आणि वाढत्या आत्मबलातून आनंदाच्या लहरी निर्माण होऊन आनंद मिळतो. ह्या आनंद लहरीची उर्जा देणारे ग्रंथ श्रीगीता व श्रीज्ञानेश्वरी हे संकटांवर मात करण्याचा मार्ग दाखवणारे स्त्रोत आहेत असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.



अंबड चौफुलीजवळील श्री गजानन महाराज मंदीरात आयोजित कार्यक्रम सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशीच्या किर्तनाचे कर्तव्य हेच भक्तीचे अंग या विषयावर पुष्प गुंफतांना फड बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, कर्तव्य हाच भक्तीचा व मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. म्हणून श्रीमद्भगवत गीता आणि श्री ज्ञानेश्वरीत कर्तव्यावरच भर देण्यात आला आहे. सामाजिक ऋणांची जाण ठेवून वाट्याला आलेले कर्तव्य पार पाडावे. कर्तव्य वाट्याला आले नाही असा कोणी असू शकत नाही. वाट्याला कर्तव्य नीतिनियमाला अनुसरून पार पाडली तर जीवनातील व समाजातील बरेच प्रश्न मिटू शकतात. त्यामुळे अंतर्बाह्य स्वच्छता, वृक्षारोपण, स्त्रीयांचा मान सन्मान, वडीलधाऱ्यांची सेवा, गरजूंना मदत अशा बाबींवर संतांनी भर दिला आहे.

संतांचे हे विचार ज्यांना जीवनात अवलंबिता येतात त्यांना भक्ती म्हणून वेगळे कांही करण्याची गरज पडत नाही. दैनंदिन जीवनातील वाढता ताणतणाव व या तणावा मागची कारणे विचारात घेवून फड यांनी जीवनात शांती, तणावमुक्ती, सुख, समाधान, सफलता, समृध्दी, आत्मबल, स्वपरीचय, आत्मोन्नती, धर्मोन्नती, न्यायदृष्टी, मनोधैर्य, औदार्य, चिंतामुक्ती, मनोबल, मानसिक स्थैर्य, आत्मभाव, विवेक, सकारात्मक दृष्टी या माध्यमातून आनंदलहरी निर्माण होण्यासाठी श्री ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा असे प्रतिपादन केले.

आनंदी जीवनाचा मार्ग सापडण्यासाठी ज्ञानेश्वरी ग्रंथाची अनुभूती घ्यावी, असेही ते म्हणाले. या कीर्तन कार्यक्रमाला ॲड दीपक कोल्हे, गोविंदप्रसाद मुंदडा, प्रा. पांडुरंग हुसे, प्रा. शामसुंदर वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते. उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# मराठी भाषा गौरव दिनी विद्यार्थीनींनी स्वरचित कविता सादर करून कुसुमाग्रजांना अभिवादन



वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) - येथील पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात उपक्रमशील शिक्षिका सौ. वैशाली शेलार यांनी मंगळवार (ता.२७) रोजी मराठी भाषा गौरव दिनी मुलींनी स्वतः लिहिलेल्या कविता मुलींनी सादर करून मराठी भाषेला समृद्ध करणारे कवी कुसुमाग्रज यांना अभिवादन केले.

पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत (राजपूत) व जेष्ठ कवी व साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी या उपक्रमाचे अभिनंदन केले. सौ वैशाली शेलार यांनी या मुलींच्या सर्व कविता संग्रही करून त्या काव्य संग्राहाला 'स्वच्छदी कविता संग्रह' असे नाव दिले. आरंभी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

मुख्यध्यपिका नीता पाटील अध्यक्षस्थानी होत्या. सूत्र संचलन बी.बी. जाधव यांनी केले.

# वैजापुरात त्रि दिवशीय श्री गजानन महाराज प्रकट दिन ग्रंथ पारायण सोहळा उत्सवात आरंभ-४००भाविक पारायणला बसले



वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) - श्री. सुंदर गणपती गजानन महाराज प्रकट दिन निमित्त येथील गजानन महाराज प्रकट दिन उत्सव समितीच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सोहळा गुरुवार(ता,२९)रोजी येथील श्री सुंदर गणपती मंदिरात सकाळी साडेपांच वाजता आरंभ झाला.

या पारायण सोहळ्यात चारशे पारायनार्थी बसले असून सर्वांना ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. रविवार ता. ०३ मार्च पर्यंत हे पारायण चालणार आहे. या निमित्ताने दररोज सायंकाळी सहा ते नऊ पर्यंत कीर्तनही आयोजित करण्यात आलेले आहे. मंडळाचे हे दहावे वर्ष आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यास संस्थापक अध्यक्ष काशिनाथ आगाज व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली समिती चे संतोष बोथरा, श्रावण चौधरी, अजय भुजबळ,राजू पुणे,श्याम पवार, गणेश धुमाळ,गोटीराम बिडवे, मिलिंद जंगम, संतोष भगत, श्याम आगाज, निशिकांत पवार, प्रकाश शेलार, दीपक आहेर, विठ्ठल टेके, विलास रामैय्या, सौ. सोनदे, सौ. चौधरी, चंद्रकांत गायकवाड, सुरेश टेके, ज्ञानेश्वर टेके, महेश धुमाळ, महेश डांगरे सहभाग नोंदवीत आहेत.

# आरोग्य विभागातील १४४६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पदस्थापनेचे ऑनलाईन आदेश

## सामान्य नागरिकांना वेळेवर दर्जेदार, आरोग्य सेवा देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन



मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - आरोग्य विभागाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी गट-अ पदाची भरती प्रकिया पूर्ण करण्यात आली. आज विधानभवनात मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १४४६ एमबीबीएस डॉक्टरांना पदस्थापनेचे आदेश ऑनलाईन देण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत तसेच मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

आरोग्य विभागाने युद्धपातळीवर ही भरती प्रक्रिया यशस्वीपणे राबविली. मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची भरती झाली असून त्या माध्यमातून राज्यातील सामान्य नागरिकांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यात यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील १७२९ रिक्त पदांसाठी एमबीबीएस व बीएएमएस उमेदवारांचे एकूण २९ हजार ५५६ अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे प्राप्त झाले होते. ६५७५ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी अर्ज केले होते. एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन अंतिम गुणवत्ता यादीनुसार १४४६ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. त्यांना आज पदस्थापनेचे आदेश देण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील १७२९ रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्याबाबत शासनाने ३० जानेवारी २०२४ रोजी मान्यता दिली होती. याबाबत दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध जाहिरात करण्यात आली होती. पदभरती प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. १ ते १८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत देण्यात आली होती. त्यानंतर छाननी प्रक्रिया पूर्ण करून आज आदेशही देण्यात आले.

अत्यंत कमी दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करून वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ नियुक्तीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले. विधानभवनात झालेल्या या कार्यक्रमाला आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# रोटेगाव-कोपरगाव हा रेल्वेच्या सर्व बाबतीत बचतीचा प्रस्तावित रेल्वे मार्ग कागदावर ठेऊ नका

**रोटगाव** ते पुणतांबा हा रेल्वे मार्ग २०वर्षांपासून प्रलंबित आहे. गोदावरी नदीवर मोठा पुल व अनेक पूल, व खर्च ही मोठा यासाठी हा मार्ग मागे पडला मात्र यापेक्षा रोटेगाव - कोपरगाव हा खूप जवळचा २६-२७किमी अंतराचा प्रस्तावित रेल्वे मार्ग खूप महत्वाचा हाती घ्यावा, विशेष म्हणजे या प्रस्तावित मार्गासाठी पुलाची ही गरज नाही, वेळ कमी,इंधन कमी व अंतर ७० ते ८० की.मी. कमी व सर्वात महत्वाचे म्हणजे वेळेची बचत हे सर्व पाहता सध्या रोटेगाव-मनमाड-येवला-कोपरगाव व नंतर शिर्डी हा फेरा ७०-८० कीमी,चा फेरा टाळायचा असेल तर रोटेगाव-कोपरगाव हा रेल्वे मार्ग फक्त २६-२७किमी अंतराचा आहे, तो भारतीय रेल्वे मंत्रालयाने तात्काळ मंजुरीसाठी घेऊन हा मार्ग त्वरित हाती घ्यावा व दक्षिण भारतीयांना, पूर्व भारतीयांना व विदर्भ तसेच मराठवाडा विभागातील शिर्डीच्या साईबाबाच्या भक्तांना साईबांबांचे दर्शन घेणे सुलभ करावे तसेच वेळ, पैसा, इंधन बचत करावी अशी विनंती आहे,

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दुर्धर आजारी रुग्णांसाठी सामाजिक संरक्षण शिबीर



वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) - समाजातील दुर्धर आजाराने पीडित रुग्णांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आहेत. याची माहिती दुर्धर आजाराने पिडीत रुग्णांना व्हावी व त्या योजनांच्या आर्थिक सहाय्याने या रुग्णांनी आपले जीवन आनंदी व रोगमुक्तपणे जगावे यासाठी गुरुवार(ता,२९)रोजी येथील उपजिल्हा रुग्णालयात 'एक खिडकी योजने अंतर्गत' सामाजिक संरक्षण शिबीर घेण्यात आले.

या शिबिरात महसूल अधिकारी, पोस्ट ऑफिस अधिकारी, एस, टी, अधिकारी, बाल प्रकल्प व विधवा पुनर्वसन अधिकारी व समाजीक व वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्याचे लाभ या दुर्धर आजार असलेल्या रुग्णांनी घ्यावे असे आवाहन केले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई, जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष(डापकु), जिल्हा रुग्णालय औरंगाबाद व एआरटी केंद्र, उपजिल्हा रुग्णालय वैजापूर यांनी या एक खिडकी योजने अंतर्गत सामाजिक संरक्षण शिबिराचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत व जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गणावणे या होत्या. प्रास्ताविक विजय पाटील व शशिकांत पाटील यांनी केले. पोष्ट कार्यालयाचे पोष्ट अधिकारी विक्रांतकुमार यांनी टपाल खात्याच्या योजनांची उपस्थित दुर्धर आजार रुग्णांना सविस्तर माहिती दिली,आगार प्रमुख एस, आर, धनवटे यांनी या रुग्णांसाठी असलेल्या सर्व सोयी-सवलती देण्यात येतील असे विशद केले,महसूल खात्याचे अधिकारी योगेश पुंड व दीपक त्रिभुवन यांनी शासनाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनांची माहिती देऊन प्रस्ताव आल्यास त्वरित सहाय्य केले जाईल असे विशद केले. सतीश कदम यांनी शासनाच्या बाल विकास व महिला विकास साठी योजनांची महिती दिली. सामाजिक कार्यकर्ते व जिल्हा आरोग्य समिती सदस्य यांनी शासनाच्या वरील सर्व अधिकारी वर्गाला शासकीय योजनाचा दुर्धर आजार रुग्णांना द्यावा त्यांची अडवणूक न करता सर्व लाभार्थी याना सहाय्य करावे असे आवाहन केले. साधना गंगावणे यांनी ही उपस्थित रुग्णांना या 'एक खिडकी योजना', उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपजिल्हा रुग्णालय च्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयमाला परदेशी, डॉ. पन्हाळ, मुख्य मेट्रोन रुख्मिनी गवई, शशिकांत पाटील, विजय पाटील, बापू वाळके, पंकज कांबळे, सतीश नरवडे, प्रशांत गिरी, विनोद गवई, राजेंद्र लाठे, संजय शिरोळे, मनीषा पाटील, मनीषा मुळे, माया पाटील, वैशाली त्रिभुवन, श्याम उचित, श्री चौधरी यांनी सहभाग नोंदविला.

# अनाथ बालकांना प्रमाणपत्र; महिला व बालविकास विभागात स्वतंत्र कक्ष

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - महिला व बालविकास विभागातर्फे अनाथ बालकांणा आवश्यक सर्व कागदपत्रे दाखले देण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. दि.५ मार्च पर्यंत ही मोहिम सुरु राहिल. या काळावधीत अनाथ बालकांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचा दाखला, मतदान कार्ड इ. उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जाधव यांची इमारत, प्लॉट नं. ९ खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे त्यासाठी एक समर्पित कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अनाथ बालकांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी या समर्पित कक्षातील परीविक्षा अधिकारी विजय विघ्ने, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी महादेव डोंगरे (९५१८९५८३५५), श्रीमती सुप्रिया इंगळे, दीपक बजारे (९३७०००३५१७) यांच्याशी संपर्क करावा,असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीमती सुवर्णा जाधव यांनी केले आहे.

# अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीसाठी जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यात येणार असल्याची माहिती समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे यांनी दिली.

शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७०७१७१७१६६७२२ असा आहे.

योजना राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल अंतर्गत राबविण्यात येते आहे. योजनेचा लाभ हा Direct benefit transfer (डीबीटी) द्वारे देण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांच्या अर्जाचे नूतनीकरण करण्यासाठी आधार क्रमांक बँक खात्यास जोडलेला असणे आवश्यक आहे. याबाबतची जबाबदारी संपूर्णतः विद्यार्थ्यांची असून त्यांनी त्यांचे बँक खाते, दूरध्वनी क्रमांक, आधारकार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे.

प्रतिवर्षाच्या शिष्यवृत्तीच्या अर्जाचे नूतनीकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांचा मागील वर्षाचा समाधानकारक प्रगती अहवाल व मागील वर्षाची किमान ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

अनुसूचित जातीच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज अद्यापही सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत. तसेच या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी या जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून फॉर्म भरून घेण्याची कार्यवाही करावी व तसेच महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज देखील तात्काळ सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना सादर करावेत. सदर अर्ज वेळेमध्ये सादर न केल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त श्रीमती सोनकवडे यांनी केले आहे.


### फॉर्म ए. आर. ४
### दै. लोकविजय प्रकाशनासंबंधीचे नियम ७ नुसार
## निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थान | : ३, स्वरांजली पार्क, चेतनानगर औरंगाबाद - ४३१००५ |
| २) | प्रकाशन काळ | : दैनिक (दर सोमवार खेरीज) |
| ३) | मुद्रकाचे नांव | : राजेंद्र पांडुरंग रांजणीकर |
| | भारतीय नागरिक आहे काय ? | : होय (भारतीय) |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : राजेंद्र पांडुरंग रांजणीकर |
| | भारतीय नागरिक आहे काय? | : होय (भारतीय) |
| ५) | संपादकाचे नांव | : राजेंद्र पांडुरंग रांजणीकर |
| | भारतीय नागरिक आहे काय? | : होय (भारतीय) |
| ६) | मालकी | : राजेंद्र पांडुरंग रांजणीकर दैनिक लोकविजय, औरंगाबाद. |
| ७) | एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भाग असलेल्या भागधारकांची नावे व पत्ते : | काही नाही. |

मी,राजेंद्र पांडुरंग रांजणीकर असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे सत्य आहे.

दि. १ मार्च २०२४

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
प्रकाशकाची सही


# महानगरपालिका लोकशाही दिन सोमवारी ४ मार्च रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. माहे मार्च २०२४ चा महानगरपालिका लोकशाही दिन सोमवार दि. ०४ मार्च २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मलिक अंबर स्थायी समिती सभागृह, मनपा मुख्य कार्यालय येथे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारीत परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर दि २० फेब्रुवारी २०२४ पर्यंत विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज दिलेल्या नागरीकांनाच दि. ०४ मार्च २०२४ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील, याची नोंद घ्यावी. ज्यांनी यापुर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणांत अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही. असे मा.उप आयुक्त तथा मुख्य समन्वयक लोकशाही दिन, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका अंकुश पांढरे यांनी कळविले आहे.

# कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादा वाढवा - सतीश चव्हाण



छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - जन्मजात कर्णबधीर असलेल्या दोन वर्षांपर्यंतच्या मुलांना राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठी शासन पाच लाख वीस हजार रूपयांची मदत करते. यामुळे जन्मत: कर्णबधीर बालकांना ऐकू येणे शक्य होते. मात्र सदरील शस्त्रक्रियेसाठीची वयोमर्यादा दोन वर्षावरून पाच वर्षांपर्यंत करावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी आज दि.२८ विधान परिषदेत विशेष उल्लेखाव्दारे केली.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या माध्यमातून नवजात तसेच दोन वर्षांपर्यंतच्या बालकांची कर्णबधीरता तपासली जाते. अशा बालकांच्या बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत नोंदणी होऊन जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या जातात. मात्र अनेकदा जन्मजात कर्णबधीर मुलांची माहिती उशिरा उपलब्ध होते. २०२० मध्ये जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावरील स्क्रीनिंग समिती स्थापन करून बालकांची माहिती घेतली असता मोठ्या संख्येने पाच वर्षांवरील कर्णबधीर बालके आढळून आली. या शिफारशीच्या आधारे राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठीची वयोमर्यादा २ वरून पाच वर्ष करण्याबाबत दोन वर्षांपूर्वीच केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. मात्र यासंदर्भात अद्यापही काहीच कार्यवाही झाली नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

त्यामुळे कर्णबधीर बालकांच्या कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठीची वयोमर्यादा दोन वर्षावरून पाच वर्षांपर्यंत वाढवावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखव्दारे केली आहे. तसेच यासंदर्भात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांच्याकडे देखील त्यांनी पत्राव्दारे मागणी केली आहे.


सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in



या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

